**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र

Estd. 1962 PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609067
NAAC 'A' Grade B.A. Exam. Section: 0231-2609116 FAX: 0091-0231-2690655
MHRD NIRF-28th Rank Website: www.unishivaji.ac.in E-mail: ba.section@unishivaj.ac.in

---

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/ दिनांक : ०८-०३-२०१७.

अत्यंत महत्वाचे

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
(अभियांत्रिकी व औषधनिर्माणाशास्त्र, शिक्षणशास्त्र महाविद्यालये वगळून)

संदर्भ :- शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/६५२१ दिनांक :- ०६/०३/२०१७
विषय :- प्रशिक्षण कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार संगणक प्रणालीमध्ये परीक्षा अर्ज भरणे व एसआरपीडी मार्फत प्रश्नपत्रिका स्विकारणे या संदर्भात आयोजित केलेल्या कार्यशाळेस उपस्थित राहाण्याबाबत कळविले आहे. सदर कार्यशाळेमध्ये परीक्षा अर्ज भरणे व एसआरपीडी मार्फत प्रश्नपत्रिका स्विकारणे या संदर्भात चर्चा होणार आहे त्याच बरोबर ऑक्टोबर २०१६ चे परीक्षा अर्ज स्विकारल्यानंतर व त्याचा निकाल जाहीर केल्या नंतर कोणत्या त्रुटी विद्यापीठास आढळून आल्या या संदर्भात चर्चा होणार आहे. तरी खालील दिलेल्या त्रुटींची यादीची प्रत कार्यशाळेस येतांना घेवून यावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
अधिक्षक

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

## दिनांक ९-१० मार्च, २०१७ च्या वर्कशॉपसाठी परीक्षा अर्ज व निकालातील त्रुटीबाबत

ऑक्टोबर, २०१७ च्या परीक्षेचे परीक्षा अर्ज स्विकारल्यानंतर नेमलिस्ट करताना व सदर परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर या विभागास प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन खालीलबाबी निदर्शनास आल्या आहेत.

१ परीक्षा अर्ज वेळेत जमा करावेत, महाविद्यालये फक्त परीक्षा शुल्क बॅकेत भरतात पण विद्यापीठामध्ये त्याचे चलन करत नाहीत, सर्व मुदती नियमित, लेट, सुपरलेट संपल्यानंतर एकाच वेळी सर्व यादया घेवून येतात व सर्व चलन एकाच वेळी करतात त्यामुळे महाविद्यालयांनी परीक्षा अर्ज भरल्याची नोंद परीक्षा विभागात होत नाही. या बाबत प्रत्येक बाब स्वतंत्रपणे भरणे व सादर करणे जरुरीचे आहे.

२ विहीत मुदतीतच परीक्षा अर्ज भरावेत मुदतीनंतर परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत, काही तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा अर्ज संगणक प्रणालीमध्ये भरला गेला नसल्यास व तो वेळाने स्विकारा किंवा मॅन्युअली स्विकारावा असे सांगितला असल्यास तसेच परीक्षा विभागामध्ये लेखी स्वरुपात यादी दयावी. पण असे निदर्शनास आले आहे की विद्यापीठात फि भरतात व मॅन्युअली परीक्षा अर्ज जमा करत नाहीत व परीक्षेच्या वेळी सुधारित बैठक क्रमांक मागणी करतात.

३ संगणक प्रणालीद्वारे परीक्षा अर्ज भरलेला असतो त्याचा बैठक क्रमांक व ओळखपत्र देखिल आलेले असते ते न पहाता परीक्षा विभागाकडून सुधारित बैठक क्रमांक मागणी करतात. दुसरा नंबर दिल्यानंतर प्रणालीमध्ये वेळीच बदल न केल्यास दोन्हीही नंबरला गुणांची एंट्री होत नाही.

४ एमकेसिएल व युनिशवाजी हे दोन पोर्टल वेगवेगळे आहेत, विद्यार्थ्यांने एकाच पोर्टला परीक्षा अर्ज भरावयाचा असतो, कोणते परीक्षा अर्ज कोणत्या पोर्टला भरावयाचे याबाबत वारंवार परिपत्रक काढून देखिल विद्यार्थी दोन्ही पोर्टला परीक्षा अर्ज भरतात.

५ परीक्षा अर्ज भरतांना चूकीचे विषय भरले जातात, महाविद्यालयाकडून ते तपासले जात नाही. त्यानुसार समरी तयार होते, हॉल तिकीट देखिल चूकीच्या विषयाचे तयार होते, विद्यार्थीही ते पहात नाहीत. परीक्षेदिवशी विद्यार्थी परीक्षेस येतो त्यावेळी परस्पर विद्यार्थ्यांस बदलेल्या विषयास बसण्यास अनुमती दिली जाते तथापी बदल केलेला विषय संगणक प्रणालीमध्ये न आल्यामुळे त्या विषयास अनुपस्थित असा शेरा येतो. ही बाब गंभिर आहे, याबाबतीत विषय बदलून दिला जाईल पण त्यास गुण दिले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

६ प्रथम वर्षाचे थेअरीचे गुण एंट्री करतांना विद्यार्थी Present असतांना त्याला Absent एंट्री केली जाते. अशा ब-याच केसिस ऑक्टोबर, २०१६ मध्ये आलेल्या आहेत. महाविद्यालयाकडून विद्यापीठाकडे गुण पाठवितांना ते तपासले जात नाही असे दिसून येते. निकाल जाहिर झाल्यानंतर विद्यार्थी ऑनलाईन मार्कलिस्ट पहातो त्यावेळी त्याला समजते की आपण परीक्षा दिली असून देखिल एखादया विषयाला Absent आले आहे, त्यावेळी विद्यार्थी महाविद्यालयामध्ये जातो त्यानंतर दुरुस्तीचा प्रस्ताव विद्यापीठात पाठवून दिला जातो त्यामध्ये विद्यार्थी Present असून Absent असे आले आहे. सोबत उत्तरपत्रिकेच्या पहिल्या पानाची झेरॉक्स जोडली आहे त्यानुसार गुण घ्यावेत असा उल्लेख केला जातो, यावरुन असे दिसते

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

की विद्यापीठानेच चूकीची एंट्री केली आहे. तथापी त्या प्रस्तावामध्ये विद्यार्थी Present असून महाविद्यालयाकडून नजरचूकीने Absent अशी एंट्री झाली आहे असे नमूद करणे अपेक्षित आहे.

७ सिट नंबर जनरेट झाल्यानंतर टर्मवर्क व प्रॅक्टीकलचे गुण एंट्री करण्यासाठी लिंक सुरु झाल्यानंतर किती तारखेपासून ते किती तारखेपर्यंत गुण भरावयाचे व ते विद्यापीठामध्ये किती तारखेला जमा करावयाचे याचे परिपत्रक काढले जाते, त्यानुसार फक्त २५ टक्के महाविद्यालये वेळेत जमा करतात काही महाविद्यालयांना २/३ वेळा फोन करावा लागतो तरी परिपत्रकामध्ये दिलेल्या तारखेलाच गुण जमा करावेत, टर्मवर्कचे गुण पाठवितांना देखिल विद्यार्थी Present असतांना देखिल Absent असे पाठविले जाते व नंतर पुन्हा अशा विद्यार्थ्यांचे गुण पाठविले जातात. तथापी या परिपत्रकानुसार गुण वेळेत पाठवावेत, काही तांत्रिक अडचणमुळे एखादया विषयाचे गुण पाठवावयाचे राहून गेल्यास ते लेखी परीक्षेच्या शेवटच्या पेपर नंतर १५ दिवसामध्ये पाठवावेत असा व्यवस्थापन परिषदेचा ठराव कमांक ३२ नुसार संमत झालेला आहे त्यामुळे या विहीत मुदतीन टर्मवर्क चे गुण न आल्यास तसे उशिरा गुण स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

८ महाविद्यालयाकडून प्रथम वर्षाचे फेरतपासणीचे/गुणपडताळणीचे प्रस्ताव पाठविले जातात. त्यामध्ये काही त्रुटी आढळूण आल्या आहेत. : फेरतपासणी (Revaluation) म्हणजे पेपर पूर्ण पुन्हा तपासणी, अशा प्रक्रियेमध्ये पूर्वीचे गुण स्टिकर लावून मिटवायचे असतात, ते दुस-या परीक्षकांना कळता कामा नये असे न करता पेपर पुन्हा तपासला जातो त्यामुळे पहिल्या परीक्षकाचे गुण फेरतपासणी करतांना कळाल्यामुळे त्या अंदाजानुसार पेपर तपासला जातो, ही बाबत चूकीची आहे.

परीक्षकाचे, परिक्षानिरीक्षकाचे व फेरतपासणीचे व गुणपडताळणीचे गुण उत्तरपत्रिकेवर कोठे लिहावयाचे हे निश्चित असतांना कुठल्याही रकान्यात लिहीले जातात. उदा. फेरतपासणी करतांना परीक्षकांनी लिहीलेल्या गुणांवर पट्टी लावून फेरतपासणी केली जाते व गुण पुन्हा परीक्षकाचे कॉलम मध्ये चिकटविलेल्या पट्टीवर लिहीले जातात तर काही विद्यार्थ्यांचे गुण मॉडरेटच्या रकान्यात लिहीले जातात ही बाब चूकीची आहे कारण मॉडरेशनच्या रकान्यात गुण लिहीले आहेत तर त्या उत्तरपत्रिकीचे मॉडरेशन झाले आहे पण त्याचे गुण घेतले नाहीत असा अर्थ होतो ही बाब चूकीची आहे. फेरतपासणी/गुणपडताळणी केल्यानंतर त्या उत्तरपत्रिकेच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत पाठविली जाते पण ती अधिकृत होण्यासाठी कॅप डायरेक्टर व प्राचार्य यांच्या सहया असणे आवश्यक आहे. याबाबत चूकीची प्रक्रिया केली असल्यास फेरतपासणी/गुणपडताळणीचे गुण स्विकारले जाणार नाहीत व तो प्रस्ताव नामंजूर केला जाईल.

९ प्रथम वर्षाचे थेअरीचे व तिस-या वर्षाचे टर्मवर्क चे गुण एंटी करतांना जर एखादा नंबर प्रणालीमध्ये नसेल तर तो मिसिंग एंटीमध्ये न टाईप करता ते त्या विषयाच्या ई-मार्कलिस्टमध्ये लिहीन पाठवावा व त्याचे कारण लिहून स्वाक्षरी करावी.

गुण भरल्यानंतर गुण Export किंवा Submit केल्यानंतर अपवादात्मक परस्थितीमध्ये एखादी दुरुस्ती करावयाची झाल्यास ती हार्ड कॉपीवर दाखवावी व तेथे स्वाक्षरी करावी व ती प्रत विद्यापीठात पाठवावी, अशा दुरुस्त्या केलेल्या ठिकाणी संबंधीतांची स्वाक्षरी नसल्यास किंवा दुरुस्तीची प्रत वेळेत जमा न केल्यास अशा दुरुस्त्यांचा विचार केला जाणार नाही.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

१०  काही तांत्रिक अडचणीमुळे काही विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये चूका होवू शकतात, विद्यार्थी Present असून Absent येणे, टर्मवर्कचे मॅन्युअली पाठविलेले गुण एंट्री न झाल्यामुळे Absent येणे मॅन्युअली भरलेल्या परीक्षा अर्जाचा निकाल वेळेत जाहिर न होणे, अशा कोणत्याही प्रकारची दुरुस्ती ही निकाल जाहिर झाल्यापासून पुढील परीक्षेचा अर्ज भरण्यापूर्वी दुरुस्त करुन घेणे आवश्यक असल्याबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी कारण महत्वाची कागदपत्रे वगळता सर्व कागदपत्रे प्रत्येक वर्षी पल्पींग केली जातात त्यामुळे २/३ वर्षांनी कार्यालयीन कागदपत्रे उपलब्ध होत नाही.

११  क्रिडा स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा निर्धारित वेळापत्रकानंतर घेतल्या जातात त्यासाठी महाविद्यालयांकडून स्वतंत्र प्रस्ताव मागविला जातो, सदर प्रस्ताव पाठवितांना

१  विद्यार्थी स्पर्धेला जाण्यापूर्वी प्रस्ताव पाठविला जात नाही

२  विद्यार्थी बैठक क्रमांक व पीआरएन नंबर लिहीत नाहीत.

३  मूळ वेळापत्रकाप्रमाणे कोणते विषय दिलेले आहेत व कोणते विषय स्पर्धे नंतर देणार आहे याची माहिती लिहीली जात नाही.

४. ज्या विषयाची परीक्षा देणार आहे त्या विषयाचे कोड नंबर लिहीले जात नाहीत.

५. खेळाडू विद्यार्थ्यांची परीक्षा घेताना सदर विद्यार्थ्यांची विद्यापीठाने नियुक्त केलेल्या स्पर्धसाठीच गेला आहे याची पडताळणी करुनच प्रस्ताव सादर करावा.

१२  परीक्षेसाठी आवश्यक असणारी सर्व स्टेशनरी ऑनलाईन भरणेचे आहे. शिल्लक स्टेशनरीचा ताळमेळ अचुक ठेवायचा आहे. वापरात नसलेली स्टेशनरी ताबडतोब विद्यापीठास परत पाठवणेची आहे.

१३ Photocopy/Revaluation/Verification of Marks बाबत सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर सविस्तर सुचना, मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांना समझातील अशा सूचना योग्य त्या ठिकाणी लावाव्यात.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com